# प्रकरण - ४

# 'जिप्सी' मधील जीवनवादी कविता

- प्रास्ताविक
- जीवनाबद्दलची आसक्ती
- परमेश्वराचा शोध
- अज्ञाताचा शोध घेणारा आनंदयात्री
- कवीचा आशावाद
- जीवनसाथीदाराबद्दलची ओढ व अपेक्षा
- पार्थिवतेचा जयजयकार अर्थात जीवनशक्तीची श्रेष्ठता
- चैतन्याचे वेड
- आत्मचिंतन
- सारांश

# प्रकरण ४

# 'जिप्सी' मधील जीवनवादी कविता

## प्रास्ताविक

जीवन हा एक सुख-दु:खाचा लपंडाव आहे. या लपंडावात सुख हे सतत चकवा देत असते. त्यामुळे काही काळ का होईना माणसाचा जीवनावरचा विश्वास उडतो. त्याला सभोवतालचे जग रिते-रिते वाटू लागते. कधी जीवनावर प्रेम करावे वाटते, तर कधी हे जीवन उधळून द्यावे अशीही इच्छा होते. कवी मंगेश पाडगांवकरांची कविता जीवनातील चैतन्याचे गीत गाते. आपल्या जीवनाकडे निराशावादी दृष्टीकोणातून न बघता शोधक दृष्टीने तिने बघितले आहे. कवीची जीवनावर श्रध्दा आहे. त्यामुळे सश्रध्द वृत्तीचा आविष्कार त्यांच्या कवितेतून दिसून येतो.

## जीवनाबद्दलची आसक्ती

पाडगांवकरांना जीवनाची प्रंचड ओढ आहे. ही ओढ त्यांच्या कवितेत ठिकठिकाणी व्यक्त झाली आहे. भावनेच्या एक प्रकारच्या जोशात ते जीवनाची गाणी गातात. हा भावनेचा जोश त्यांच्या शब्दाशब्दातून व त्या शब्दांच्या गतीतून आपल्या मनाची पकड घेतो. त्याच्या आवेगाने आपल्या मनाचे बांध ढासळून पडतात. आपल्याबरोबर वाचकांच्या मनालाही ओढून नेण्याची शक्ती पाडगांवकरांच्या ह्या उक्तीत आहे. महत्वाचे म्हणजे ज्या काळात जीवनाकडे निराशावादी दृष्टीकोणाने पाहाणारी मर्ढेकरांची कविता अवतरली. त्या काळातच जीवनाकडे आशावादी दृष्टिकोणातून पाहाणारी मंगेश पाडगांवकरांची कविता अवतरली. जीवनावर प्रेम करणारी, जीवनाविषयक श्रध्दा-निष्ठा जपणारी पाडगांवकरांची कविता जीवनावरील प्रचंड श्रध्देतून जन्मास आलेली आहे. या जीवनविषयक आसक्तीतूनच ते निसर्गसौंदर्याचे विविध विभ्रम अनुभवतात. त्या विभ्रमांनी वेडावून-हुरळून न जाता त्या सौंदर्य विभ्रमाच्या चिंतनातून ते जीवनाचा अर्थ शोधतात. म्हणूनच प्रा.वा.ल.कुलकर्णी म्हणतात की, "ह्या जीवनाबद्दलच्या अखंड कुतूहलामुळेच - अखंड ओढीमुळेच आपण एक जिप्सी आहोत असे त्यास वाटते"?

## परमेश्वराचा शोध

चराचरात परमेश्वर भरुन राहिला आहे. निसर्गात, माणसात सर्वत्र त्याचे अस्तित्व जाणवते. त्यामुळे तो आपणास खुणावतो असे कवीला वाटते. त्यातच आत्मसुखाचा शोध घेणारे हे मन कुठेही स्थिरावत नाही. नावीन्याचा शोध हा या भाववृत्तीचा केंद्रबिंदू आहे. त्यातूनच जीवनमूल्याचा शोध कवी घेते.

"दिसू लागले डोंगर जरा मिटता लोचन
तिथे कुणी तरी मला नेऊ लागले ओढून
मिटलेल्या डोळ्यांपुढे खळखळणाऱ्या लाटा...
सळसळणारी पाने... दूर पळणाऱ्या वाटा
वाटासवे त्या पळालो सारे काही झुगारुन
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून"[२]

घराच्या चार भिंतीत हे मन स्वत:ला अडकवून ठेवू शकत नाही. दूर अनंताची साद त्याला बोलावते आणि मनातील खोलवर दडलेला जिप्सी स्वत:च निर्माण केलेले घर उधळून गुढतेचा शोध घेण्यासाठी झेपावतो. वास्तवाच्या निखाऱ्यांनी हे मन कुठेही करपून गेलेले नाही. सुरुवातीपासूनच नटवे, हळवे, स्वप्नील, झाडा-पानांवर-फुलावर, डोंगरावर, धरतीवर, आकाशावर प्रेम करणारे हे मन आहे. आपण आनंदयात्री आहोत. याची घोषणा करतच प्रकट झ‍ालेल्या या जिप्सीचे विश्व निसर्गाच्या संपत्तीची लयलूट करताना दिसते.

सुरुवातीला आई-वडिलांचे बोट धरुन चालणारे मूल स्वत:च स्वतंत्र चालू लागले की आपल्या अस्तित्वाच्या नव्या खुणा शोधण्यासाठी बालपणापासून धडपडत असते. खळखळ वाहणारी नदी, तारे, चंद्र, सूर्य, आकाश, झाडे या जगात ते रमू लागते. आभाळात झेप घेणाऱ्या पाखरांचे अस्तित्व त्याला अधिक जवळ वाटते. अशा वेळेस चार भिंतींची चौकट त्याला असहाय्य होते. जे अज्ञात आहे त्याचा शोध घेणे हे विलक्षण वेड त्याला लागते.

बालस्मृतीच्या पार्श्वभूमीवर अवतरलेली 'जिप्सी' ही कविता भूत-वर्तमान-भविष्य काळातील जाणिवांना स्पर्श करते. लहानपणीचा स्वप्नील अनुभव जेव्हा वास्तवस्पर्शी होतो तेंव्हा जीवनाचा खरा अर्थ शोधण्यासाठी मन धडपडते. घरट्याची ही ओढ त्यातून निर्माण होते. माणुस घरटे निर्माण करतो पण जेव्हा घरटे निर्माण होते तेव्हा मात्र तो अस्वस्थ होतो. यापेक्षाही आपल्याला काही वेगळे हवे असे त्याला वाटू लागते. या सर्वसामान्य अनुभवाला असामान्यता

लाभताच अलौकिक भावविश्वाच्या खुणा त्याला बोलावू लागतात. यातूनच 'जिप्सी' या कविवृत्तीला अनेक धुमारे फुटू लागतात.

बालपणी सवंगड्यांच्या सहवासात कवीने घर बांधले. त्या घराला पानांची कौले आहेत. झावळ्यांच्या भिंती आहेत. हिरव्या चैतन्याची ओढ बालमनात अशा रुपाने रुजल्याची प्रचिती येते. मात्र कौतुकाने बांधलेले हे घर कवी आकस्मात उधळून देतो. या दोन टोकाच्या बालअनुभवातच भावी जिप्सीच्या पाऊलखुणा उमटलेल्या आहेत.

शालेय जीवनातील ती गोड स्मृती कवीला आजही सुखावते. वर्गात गेल्यानंतर जाड काचेची चाळिशी घातलेले पंतोजी, त्यांची उग्र नजर, त्या नजरेचा पहारा हे बालमन झुगारते. पानांच्या हातानी बोलावणारी खार, बालमनाच्या संयमाचे दरवाजे उघडून टाकते आणि चार भिंतीची चौकट फोडण्याचे साहस बालमन करते. बालजीवणातील ही घटना कवीच्या ठिकाणी कुठतरी रुतून बसते. त्यामुळेच भावी जीवनाला अस्वस्थतेचा शाप मिळतो. गृहस्थीजीवनाची सुरवात घर मांडून सुरु झाल्यानंतर सर्व सुखे असताना खोल खोल मनात कुणीतरी दु:खी होते. पत्नी, मुले, ऐशाआराम या लौकीक सुखात कवीमन समाधानी रहात नाही. शालेय जीवनात जशी त्याला झाडे बोलावत होती, खार खुणावत होती तशीच अवस्था या संसारिक जीवनात त्याची होते. मिटलेल्या डोळ्यापुढे अपार्थिवाच्या खुणा कवीला दिसू लागतात डोंगर, खळखळणाऱ्या लाटा, सळसळणारी पाने दूर पळणाऱ्या वाटा कवीला पार्थिव बंधनातून मुक्त करु लागतात.

'घर असूनहि आता घर उरलेले नाही
चार भिंतीची जिप्सीला ओढ राहिलेली नाही
कुणी सांगाव? असेल पूर्वजन्मीचा हा शाप
घडी सुस्थिरपाची विसकटे आपोआप..
कुणीतरी साद घाली दूर अनंतामधून
एक जिप्सी आहे माझ्या खोल मनात दडून'[३]

सुरवातीला घराचे जबरदस्त आकर्षण व नंतर त्याच घराचा कोंडवाडा वाटण्याची वृत्ती अशा दोन टोकाच्या भावनेत कवीच्या सौंदर्यवेडया वृत्तीचे बीज रूजलेले आहे. या सौंदर्यशोधापलिकडे गूढ अज्ञाताचा शोध घेण्यासाठी कवी आसुसतो. यात घर असून त्याला घर उरत नाही. चार भिंतीची जिप्सीला ओढ राहिलली नाही. असे चमत्कारिक का घडावे हे जेव्हा

कवीला कळत नाही तेव्हा कवी दैवावर विश्वास ठेवतो. सुस्थिरपणाची घडी विस्कटण्यात कदाचित पूर्वजन्मीचा शापही कारणीभूत असेल असे कवीला वाटते. मात्र या पलीकडे जाऊन दूर अनंतातून साद घालणारी गूढ शक्तीच आपण निर्माण केलेले आपणच मोडू धजण्यास कारणीभूत आहे याची खात्री कवीला पटते.

## अज्ञाताचा शोध घेणारा आनंदयात्री

'जिप्सी' ही प्रतिमा आहे, जिप्सी ही एक भटकी विमुक्त जमात आहे. कुठेच एका ठिकाणी स्थिर रहाणे. या लोकांना जमत नाही, आवडत नाही. कवीची वृत्ती अशीच आहे. पानांची कौले, झावळ्यांच्या भिंती, जाळीमधील धुक्याचे तेज, खेळ मांडणे-मोडणे या सर्व प्रतिमांतून पाडगांवकरांची जिप्सी वृत्ती दिसून येते. जाळीमधून धुक्याचे झिरपणारे तेज मनात सांडते व ज्ञात विश्वाची चौकट कवीला जाचक होते. काही गूढ, अंधुक, पुसट असे दिसू लागताच मांडलेला खेळ मोडण्याचे साहस कवीला होते. त्या गूढ-अज्ञात धुक्यात बुडणे हेच मग कवीला प्रिय होते. म्हणून ते म्हणतात -

'धुक्यात आम्ही कोरित बसतो
गुपित मनातिल थरथरणारे
विणीत बसतो लाटांमधले,
प्रतिबिंबाचे गूढ इषारे'[४]

धुक्यात मनातील थरथरणारे गुपित कोरत बसतो हे सांगताना जे अती कठिण आहे, जे पकडणे, व्यक्त करणे केवळ प्रकाशातही अशक्य आहे ते धुक्यात कोरीत बसणे, त्या गुपिताला आकार देणे, रुप देणे आणि तेही जिथे स्वर्ग धरतीला येऊन मिळाला आहे. निसर्ग सौंदर्याचे गुपित कळते-जाणवते परंतु प्राप्त होत नाही. असे जाणवणाऱ्या गूढ तरल क्षणांचा आस्वाद कवी घेतो.

या धुक्यात एकाच वेळेस कोरणे व विणणे अशा दोन क्रिया चालू असतात. त्या क्रियांनी त्या थरथरणाऱ्या कोमल गुपिताला एक संवेध विशेषता प्राप्त होते. लाटांमधल्या प्रतिबिंबाचे गूढ इशारे धुक्यात विणत रहाणे हा एक अजबच खेळ आहे. त्यातून कवी अज्ञाताचा शोध घेतो. प्रत्यक्ष न दिसणारे फक्त जाणवणारे शब्दात पकडण्याचा प्रयत्न कवी करतो.

**एक आनंदयात्री होऊन आपण त्याचा शोध घ्यावा असा त्यांना आत्मसाक्षात्कार होतो. पाडगांवकर हे हसत जीवन जगणाऱ्यांच्या वृत्तीचे आहेत. त्यातच ते एक सौंदर्यजीवी** भावकवी आहेत. सुंदरतेच्या सुमनावरचे दव चुंबुन घेणारी बालकवींची हळूवार वृत्ती पाडगांवकरांच्या ठिकाणी आहे. या भाववृत्तीमुळेच ते 'आनंदयात्री' कवितेत म्हणतात -

'हलके काढून
कंटक पायींचे
स्वरात विणिले
सर मी स्वप्नांचे
हासत दु:खाचा
केला मी स्वीकार
वर्षिले चांदणे
पिऊन अंधार
प्रकाशाचे गाणे अवसेच्या रात्री
आनंदयात्री मी आनंदयात्री'[५]

जीवनव्यवहारात सुख:दुखे येणारच मात्र पायीचे कंटक काढून, दु:खांना पचवून पुढे गेले पाहिजे. दु:खांचा स्वीकार केला पाहिजे. अंधार पिऊन चांदण्याचा वर्षाव करण्यातच पुरुषार्थ आहे. अमावस्येचा अंधार कवटाळून दु:ख उगळण्यापेक्षा ते स्वीकारुन प्रकाशाचे गाणे गावे असे कवीला वाटते.

निसर्गाशी चाललेला संवाद कवींना केवळ सौंदर्याच्या विभ्रमात बांधून घेत नाही तर जीवनातील अंतिम सत्याचा शोध घेण्यास प्रेरित करतो.

मानवी जीवनापलीकडे पसरलले अथांग विशाल जीवन असून तिच्या अणू-रेणूत सृजनाचे ऐश्वर्य उधाणत असल्यामुळेच आपल्याही ओठावर गाणे आहे. अशी पाडगांवकरांची श्रध्दा आहे. खळखळणाऱ्या लाटांवरचा खिदळणारा फेस, पश्चिम, क्षितिजाच्या भाळावर रुळणारी सावळ्या ढगांची बट, शांत झोपल्या धुळीस गुदगुल्या करणाऱ्या चंचल सावल्या, संथ निळ्या पाण्यामधील सुजाण आशय एकंदरीत या सृष्टीच्या कणाकणात सौंदर्यतराणे आहेत आणि म्हणूनच आपल्या ओठांवर गाणे आहे अशी पाडगांवकरांची निष्ठा आहे. या निसर्गप्रीतीमुळेच निर्मळ निसर्गसुक्ते ते लिहितात; सृजन शक्तीचा महिमा गातात. निसर्गप्रीतीचा निर्मळ उद्घोष करतात. अफाट आकाश, हिरवी धरती, पौर्णिमेची रात्र, सागराची

भरती, कुरणांच्या ओठातली पाचूंची लकेर, जलवंतीच्या पोटी असलेला प्रकाशाचा गर्भ या सगळ्यामधून अखंड नूतन असलेली धरती कवीला दिसते. म्हणून या सृष्टीचे ऋण ते मान्य करतात. या मातीशी असणारे अतूट नाते त्यांना कळते. ही माती, हा निसर्ग हेच सत्य आहे. पार्थिवता हाच जयनाद आहे. या आत्मप्रतीतीने पार्थिवतेचे अभिनंदन करण्याचे भाग्य कवी पाडगांवकरांना लाभते. त्यामुळे आपण एक आनंदयात्री आहोत असा आत्मसाक्षात्कार त्यांना घडतो. मेघांचे उत्सव, दवात तीर्थदर्शन, क्षितिजाची भलावण पाशाविण त्यांना खिळवून ठेवते. या आनंदप्रवासात हलकेच पायातील कंटक काढताना कवी स्वप्नांचे सर स्वरात विणतो.

जीवनाच्या अखंड ओढीमुळेच दु:खाचा स्विकार हसतपणे कवी करतो व अवसेच्या रात्री प्रकाशाचे गीत गाण्यास तो उत्सुक होतो.

## कवीचा आशावाद

'अंधार' ही प्रतिमा निराश भावावस्थेची सूचक आहे. मात्र हा अंधार नुसता अंधार राहात नाही तर तो खिन्न आंधळा अंधार असतो. आंधळी उदासीनता भरलेली रात्र निमुटपणे सर्व काही भोगते ती निश्चित संपणार आहे, कारण आता उजाडेल ही कवीची दृढ श्रध्दा आहे. कवी निराशेने ग्रस्त न होता 'रात्रीच्या गर्भात असे उद्याचा उष:काल' या श्रध्देचा पूजक आहे. म्हणून ते म्हणतात.

'आज सारे भय सरे
उरी ज्योतिर्मय झरे
पहाटेचा आशीर्वाद प्राणातून उगवेल
आता उजाडेल'[३]

दिशादिशांमध्ये सुखानुभव मोहणार आहे. शुभ्र आनंदाच्या लाटा गाणार आहेत. खगांच्या मृदु गळ्यात किलबिल पालवणार आहे. वारा पर्णात हसणार आहे. हे खरे पण त्याच्या हसण्यातही मुग्ध हिरवेपणा असणार आहे. गहिवरल्या प्रकाशात दहिवर सांडणार आहे. खिन्नतेची बंद दारे उघडली गेल्यामुळे पारिजात आनंदाची बरसात करणार आहे.

जीवन जगण्याबद्दलचा विश्वास अंधार भोगण्यातून निर्माण होतो, अशी प्रतीती जेंव्हा कवीमनाला येते तेव्हा कवीच्या कल्पना विलासाचे भावरुप निसर्गदृश्यातून अवतरते. खिन्न आंधळा अंधार, किरणांची कलावूत, शुभ्र आनंदाच्या लाटा, गहिवरला प्रकाश, गोड कोवळा

गारवा, निळा सोनेरी गौरव, अशा विविध शब्दचित्रातून पाडगांवकरांच्या भावानुभवाला एक परिमाण लाभते. अंधारातून प्रकाशाकडे निराशेकडून आशेकडे धावणारे मन जीवन त्याच्याठिकाणी जीवन जगण्याबद्दलचा विश्वास निर्माण करते.

पाडगांवकरांच्या भावविश्वात अज्ञाताचा शोध घेणारी, सौंदर्याच्या पाऊलखुणा शोधणारी जी वृत्ती आहे. त्या वृत्तीचे नांव 'जिप्सी' आहे. असे जिप्सीपण लाभणे हा पूर्वजन्मीचा शाप आहे असे वाटत असतानाच गूढ अज्ञात शक्तीचे आकर्षण हाही परिणाम असावा असे कवीला वाटते आणि याच क्षणाला न संपणाऱ्या दु:खाचा जन्म होतो.

'हे विचित्र दु:ख असे
घेऊनि उरि मी जगतो
घरट्यातुन, गगनातुन
शापित मी तगमगतो'[७]

अशी एक सखोल अनुभवाची तीव्रता त्यांच्या या कवितेत आहे. 'पंख' या प्रतिमेतून 'मुक्ततेतच खरा आनंद आहे' याचे सूचन आहे. जीवनावरील प्रेमामुळेच तो आपल्या हातांनी घरटेही निर्माण करतो. ही जगण्याची ओढ. तसेच हे उडण्याचे वेड-घरट्याच्या लोभात गुंतूनही गगनाच्या भव्यतेने त्याचे मन वेडावते. घराचा भावबंध गगनाच्या ओढीने तुटून पडतो. अशी भावनांची गुंतागुंत कवीच्या मनाची तगमग तगमग करते.

पाडगांवकरांना मनाचे हे द्वंद अधिकच व्याकूळ करते ज्या क्षणी आकाशाच्या अथांगतेचा वेध घेण्यासाठी हे मन उडते. त्याच क्षणाला घरट्याकडे हे मन ओढले जाते. त्या घरट्याच्या सुखात हरवताना गगनाचा भव्य पिसारा क्षुद्र वाटू लागतो. अशी निर्माण झालेली मनाची द्वंद्वावस्था हे कवीचे दु:ख मोठे विचित्र आहे. ते दु:ख घेऊन जगणारा कवी घरटे-गगन यांच्या सीमारेषेवरचा एक शापित होतो. पूर्वजन्मीच्या शापावर बोट ठेवतो आणि दूर अनंताच्या सादेला तो प्रतिसाद देतो. दोन्ही ठिकाणी शापित जगणे ओघानेच येते. परंतु इथे 'हे' का 'ते' ? 'घरटे' का 'गगन'? अशा द्वंद्वात मन अडकते व कोणताच निर्णय ते घेऊ शकत नाही म्हणून दु:खी होते.

या कवितेत पार्थिवाला लागलेली अपार्थिवाची ओढ रुपकात्मक प्रतिमेतून व्यक्त झाली आहे. 'घरटे' हे रुपक कवीची जगण्याची ओढ व्यक्त करायला समर्थ ठरले आहे. गगनाचे

भव्य पिसे कवीला लागते. त्या अनाकलनीय भव्य अथांगतेत स्वत:ला बुडवून घ्यावे म्हटले तर घरट्याचा लोभ सुटू शकत नाही. शेवटी काय? या प्रश्नात फक्त जगणे आणि तेही दु:खरुप या प्रश्नाच्या आवर्तात हे मन अडकते.

मनाच्या भावनाट्यात घरट्याचा लोभ, जगण्याची प्रीती व गगनाची ओढ यातून जन्माला आलेले विचित्र दु:ख, त्या दु:खाची कळ पाखरांच्या रुपकातून ठळकपणे व्यक्त झाली आहे. पंखात बळ असलेले पाखरु आकाशात उंच भरारी घेऊन उडते मात्र त्याच वेळी त्याला सुरक्षित घरट्याची ओढ वाटून ते घरट्याकडे झेपवते.

जिप्सीमुळे सुस्थिरपणाची घडी विसकटते हे नक्कीच. परंतु सुस्थिरपणाची घडी विसकटण्यात आनंद आहे. कारण गगनाकडे झेप घेण्याची संधी व आनंद त्यामुळे मिळणार आहे. परंतु दोलायमान मनाची तगमग वाट्यास येते. हा पूर्वजन्मीचा शाप होय ज्यामुळे हे शापित जगणे वाट्यास आले असे वाटत असतानाच दूर अनंताची साद ऐकू येते. यात पूर्व पुण्याईचा ठेवा सामावलेला आहे. अशी सुखद जाणीव कवीला होते.

काही वेळा मन खूपच उदास होते. त्यातच संध्याकाळची वेळ तर मोठी चमत्कारीकच! ही कातरवेळ एखाद्या विकल प्रेयसीसारखी उदास होते. तिची व्याकुळता पाहून दूरचा माळ खिन्नपणा पांघरुण बसतो. फिकट पांढऱ्या चंद्रकोरीचे उरात आभाळ जपत बसणे, मेघाचे एकाकीपणे संथ तरंगत जाणे-शोधणे जणूकाही त्या खिन्न माणसासारखेच आहे. भव्य विशाल पर्वतही अंधाराचे ध्यान करतो. जळाचे कळवळणे, कसलीतरी तळमळ लागल्यासारखे विव्हळणे, पिंपळाचे गतकाळ आठवणे, वाऱ्याच्या झुळकीचे अकालीच प्रौढ होणे, तिचे खट्याळ हास्य विरणे या सर्व घटना उदासवाण्या संध्याकाळच्या वियोगात भर टाकतात. त्या इतक्या की संध्याकाळचे उदासपण अधीकच गडद होत जाते. या काळोखाचे वर्णन करताना कवी म्हणतात.

'उरल्यासुरल्या प्रकाशकणिका
खिरल्या काळोखातच देखा
दूर कुठेसा परंतु दिसतो, लाल केशरी जाळ!
ही उदास संध्याकाळ'[८]

जळात विरुन गेलेल्या अंधारामुळे सावल्या भयभीषण वेताळासारख्या वाटतात आणि या उदासिनतेचा गडदपणा उरल्यासुरल्या प्रकाशकणिका, काळोखात खिरल्यामुळे अधिकच

वाढतो. तरीही ही उदास संध्याकाळ दूरवर लाल-केशरी जाळ बघते आणि तिच्या वेदनेला अर्थ येतो. तिच्या मनात आशा उत्पन्न होते. लवकरच उजडेल असे वाटते.

लाल केशरी ही प्रतिमा 'पहाट होणार आहे' असा भावार्थ सूचित करते आणि ही उदास संध्याकाळ लाल केशरी जाळ दूरवर बघताना जीवनाभिमुख होते. उदासिनतेचे पटल गळून पडणार आहे, असा विश्वास तिला वाटतो.

मात्र भिजल्या रात्री एककीपणाची एकांताची तीव्र कळ कवीचा पिच्छा सहजा-सहजी सोडण्यास तयार नाही. कवीची ही मन:स्थिती पुढील ओळीतून स्पष्ट होते.

'जमीन काळी
मातला अंधार
घट्ट कवळी...'[८]

पाडगांवकरांची कविता दृश्यरुप होतानाच मनरुप होत असते हे तिचे वेगळेपण जवळ जवळ सर्वच कवितेतून दिसून येते. अंधारात भिजलेली रात्र तिच्या कापऱ्या तंद्रीत भिजलेली पाने, उडणारा काजवा एकाकीपणे झुरत मालवणारा बुडालेला असतो. मात्र त्याचवेळी अंधार काळया जमीनीला कवटाळतो. एकाकीपणाच्या दु:खात सुखाची आशा प्रकट होते.

या अंधारसावल्या जणू अभिसारासाठी आसावलेल्या प्रणयिनीच आहेत. त्या रात्रीच्या भिजलेपणात असणाऱ्या तरल संवेदना व्यक्त करतात. एकांताची तीव्र कळ इथेही व्यक्त झाली आहे. मात्र या तीव्र वेदनेला मीलनाचा सुखद आनंद लाभला आहे. या मीलनात मत्त आवेग आहे, मादक गंध आहे. त्यामुळे एकाकीची वेदना सुसह्य झाली आहे.

मातलेला अंधार काळ्या जमिनीला घट्ट कवळतो आहे. पाडगांवकरांच्या या निसर्गानुभवाला मीलनाची तृप्तता आहे, आशेचे भावांकुर आहेत. सृजनशीलतेचे साकारलेले स्वप्न आहे, म्हणूनच काळोखाला नक्षत्रांचे कोंब येतात, काळ्या जमिनीला मातलेला अंधार कवळतो. अंधारातुन-प्रकाशाकडे, लयातून-निर्मितीकडे, मीलनातून-सृजनशीलतेकडे कवीचे स्वप्न साकारते, बीजामधून वर येणाऱ्या वृक्षाप्रमाणे कवीची आशा नित्य विकसते.

हाच आशावाद 'अजुन व्हायची जरी पहाट' या कवितेतूनही दिसून येतो. इथे कवी म्हणतात -

'पण जाणिवेची गळे कशी तमाची ओढणी?
उरी उघडली कशी प्रकाशाने ही पापणी?
आतल्या प्रकाशी नाहली रात
अजून व्हायची आहे पहाट!'[१०]

कवितेतील पहाट होण्यापूर्वीचे वर्णन चित्रदर्शी आहे. अजून पहाट व्हायची आहे. सारी झाडे अंधारात झाकलेली आहेत. त्यांच्या झोपण्यातसुध्दा एक प्रकारची निरवता ओथंबुन राहिली आहे. असे असले तरी दूर जाणारी पाऊलवाट मात्र अंधुक दिसते आहे, हळूहळू अस्पष्ट डोंगर दिसू लागले आहेत. प्रकाशाने रात्र न्हावून निघू लागली आहे. त्यामुळे आता अंधार उरणारच नाही. हा आशावाद कवीला आहे. पुढे ते म्हणतात, आतील-बाहेरील अंतर आता उरलेले नाही, तमाची ओढणी गळून पडली आहे.

या सर्व प्रतिमातून अंधारातून-प्रकाशाकडे, निराशेतून-आशेकडे धावणारे मन, जीवन जगण्याबद्दलचा विश्वास निर्माण करते. म्हणून ते म्हणतात.

'काजळाच्या कोषातून
उडे पाखरु तेजाचे
अशावेळी काळोखाला
येती कोंब नक्षत्राचे'[११]

प्रकाशात रात्र न्हावून निघाल्यानंतर अंधार उरणारच नाही. चराचरात भरुन उरलेला काळोख उदावाणेपणा पांघरुन बसला आहे. पण कवी त्या अंधारात संपूर्णपणे बुडत नाही. कुठेतरी लाल जाळ दिसतो, तमाची ओढणी गळून पडते. तसेच अंधाराच्या कोषाला भेदणारे तेजाचे पाखरु, काळोखाला नक्षत्रांचे कोंब येणे या सर्व प्रतिमा कवी पाडगांवकरांची जीवन जगण्याची ओढ सुचित करतात. वेदनेची असहाय्य कळ असलेल्या जगण्यातच उबेचे भव्य स्वप्न सामावले आहे असा विश्वास पाडगांवकरांच्या कवितेतून दिसतो. मात्र काहीवेळी ही खिन्नता, निशब्दता पंख छाटलेल्या पक्षासारखी साऱ्या अंधारावर पसरलेली दिसते.

'विध्दपंख पक्ष्यापरी नि:शब्दता पडे
आकारांचे जग सारे अंधारात बुडे
क्षीणतेज चमकतो दूर एक तारा
खिन्नतेचे ओझे वाही थकलेला वारा'[१२] !

**सारे जग अंधारात बुडालेले आहे. दूर कुठेतरी एखादा तारा क्षीणपणे चमकतो आहे. थकलेला वारा खिन्नतेचे ओझे वाहात आहे. वाऱ्याच्या झुळकीबरोबर एखादी फांदी हलताच** जणूकाही मंत्रमुग्ध झालेल्या विचित्र सावल्या दचकत आहेत. सळसळ गिळून पिंपळाची पाने निपचित अंधारात मुक्याने उभी आहेत. वातावरणातही ही सिन्नता, उदासिनता कवीच्या मनाला ग्रासते.

अशा एकाकीवेळी कवी आपल्या मनाला स्तब्ध, शांत रहाण्याचे आवाहन करतो कारण शब्द तेच असले तरी त्यातील सुगंध आता उडाला आहे. सूर तेच असले तरी मनात मात्र आनंद नाही. पण ही एकाकीपणाची अवस्था जास्त वेळ रहात नाही. कारण अंधाराला ज्याक्षणी नक्षत्रांशी असलेले आपले नाते कळते त्या क्षणी भूमीचा थर भेदून हिरवे गवत पाते वर येते. ते धरेला दृढ आलंगन देते. आषाढ या मातीचे लवून चुंबन घेताच हे परिवर्तन आकस्मित घडते. हा निसर्गामधला गंधीत क्षण कवीच्या जीवनात असाधारण ठरतो. या क्षणातच आपल्या उभ्या आयुष्याचे देणे सामावले आहे असे कवीला वाटते. तो म्हणतो -

'त्याच क्षणी मी अमर जाहलो
लंघुनिया मरणाचे कुंपण
मरण विरघळे अमरपणातच
उमले जेव्हा सृजनाचा क्षण!
गळला घुंगरपट काळाचा
प्रियकर होऊन आले जीवन
दिक्कालाच्या अतीत झाले.
या प्राणांचे अमृतमीलन'[१३]

जीवनावर प्रेम करणारे पाडगावकरांचे श्रध्दाळू मन मरणातच अमरपण आहे, हीच सृजनशीलतेच्या विजयाची ग्वाही आहे असे मानते. ही ग्वाही इवल्याशा तृणपात्याने दिली आहे. अंधारातच प्रकाश आहे ही तांब्यांची आशावादीवृत्ती पाडगांवकरांच्या ठिकाणी पर्यायाने येऊन मिळाली आहे. तिच्या आविष्काराचे रुप तांबे यांच्यापेक्षा निश्चित वेगळे आहे. जीवनाची अथांग ओढ पाडगांवकरांना आहे. या ठिकाणी काळाच्या सीमारेषाही पुसल्या गेल्या व या सृजनशक्तीचा विजय पाहून अमृतमीलनात प्राण न्हावून निघाले असे कवीला वाटते. या क्षणाला स्वत:चा विसर पडावा आणि हिरव्या चैतन्याच्या सत्कारासाठी आनंदून सामोरे जावे असे कवीला वाटते. ही घटना आशा फुलवते. जगण्याची आशादायी नवी प्रेरणा देते.

## जीवनसाथीदाराबद्दलची ओढ व अपेक्षा

आजच्या या यंत्रयुगात माणसाचे जीवन जणू भावनाशुन्यच झाले आहे. प्रत्येक जण आपल्या पुरते जीवन जगत आहे. त्यातच प्रत्येक गोष्टीचा पै अन पै मध्ये हिशेब ठेवल्यामुळे मांगल्य, सुख, आनंद या जीवनमूल्यांना तिलांजलीच मिळाली आहे. त्यामुळे जीवनाची सुंदरताच लोपू लागली आहे. अशावेळी जीवनावर भरभरुन प्रेम करणाऱ्या आशावादी वृत्तीच्या कवी पाडगांवकरांना जीवन साथीदार कशी हवी आहे, तर -

'यंत्रापरि हे होता जीवन<br>
मंत्रापरि ये ह्ृदर्भातुन<br>
हे चिरयौवन, अखंडनूतन! जीवनघन बरसू<br>
ये नवीन होऊन पुन्हा तू, ये नवीन होऊन"[१४]

नवीन-नवीन रुपातून ती परत परत दिसावी अशी कवींची अपेक्षा आहे. यंत्राप्रमाणे झालेल्या या जीवनात तिने मंत्राप्रमाणे यावे ज्यामुळे यंत्रासारखे बनलेले हे जीवन तिच्या येण्याने आनंदी होईल अशी कवी अपेक्षा करतो. मात्र कवी फक्त तिच्या सहवासातच आनंद मानत नाही तर अवतीभोवतीचा जनसागर, चराचरसृष्टी या सर्वांमधून कवीला सुखाची, आनंदाची प्राप्ती होते कारण या सर्वांमध्ये कवीला ईश्वरांश दिसतो. ती त्याही रुपात दिसावी. तिने सुध्दा निसर्गाशी जवळीक साधलेली असावी असे त्याला वाटते. म्हणूनच तो तिला सांगतो -

'जर पहाटेच येणार तरी<br>
ये धुके होऊनी गहन निळे<br>
रे, नकळत तव करुणेपरि जे<br>
दव होउनि हरित तृणी निथळे'[१५]

तिने धुके किंवा दव होवून यावे असे कविला वाटते. तसेच तिने रस-रंग-नाद-गंधातून यावे. फुला-फळातून, ऋतुऋतुतून, वाऱ्यातून, जलधारातून परमेश्वरासम यावे अशी कवीची मनिषा आहे. यातून कवीचे श्रध्दाळू मन व निसर्गात व साथीदारात सुध्दा ईश्वर पहाण्याची वृत्तीच दिसून येते.

कवीचा स्त्री-पुरुषाकडे पहाण्याचा दृष्टीकोणही समान आहे. म्हणून कुणीच कुणावर वर्चस्व गाजवू नये असे कवीला वाटते. म्हणून प्रियकराशीतद्रूप होऊन जीवन साफल्य मिळविताना प्रेयसी त्याला प्रश्न विचारते -

'रे तुझिया सामर्थ्याने
मी कसे मला विसरावे?
अन रंगाचे गंधांचे
मी गीत कसे गुंफावे?'[१६]

प्रियकराने अभिसार होऊन पहाटे किरणांच्या तारा छेडीत भोवती स्वरांची उधळण करीत यावे. धुक्यातून शोधत येताना दवबिंदू होऊन यावे असे मनोगत ती व्यक्त करते. तिची इच्छा एकरुप होण्याची आहे तरीही ती म्हणते, 'तुझिया सामर्थ्याने ढळतील दिशा जरी दाही, मी मात्र उमलणार नाही' कारण तिला सत्व जपणे महत्वाचे वाटते. तिच्या वागण्यामध्येही एक प्रकारची मर्यादा आहे म्हणून तो तिला म्हणतो -

'सांगितलेस गुपित
पहाटेच्या दवापरी
हळू तृणाच्या कानांत'[१७]

कळीने असे पानाआड दडूनच फुलावे तसे तिचे फुलणे कवीला भावते. पहाटेच्या दवाने जसे आपल्या मनाचे गुपित तृणाच्या कानात सांगावे. तसे तिचे आणि त्याचे मनो मीलन भारतीय संस्कृतीतील मर्यादशीलतेची साक्ष देवून जाते. तिच्या वागण्यातील मार्दव, पावित्र्य अनुभवल्याने तो सुखवून जाते. जीवन जगताना कवीला अशाच हातांची गरज आहे म्हणून ते म्हणतात -

'हात हवे मज
ख्रिस्तापरि ते पवित्र तसले!
वर्षेहुनि जे दर्यार्द्र असुनी,
कडाडणारा करांत आसुड घेउनि येती
क्रुध्द विजेपरि आणि उगारिति
त्यांच्यावरती, केला ज्यांनी
बाजारच मंदीर प्रभुचे;
विकिती जे बांधून खगांना,
मुक्त उडावे नभात ज्यांनी;
विकिले ज्यांनी अपुले आत्मे
क्षुद्र आपुल्या स्वार्थासाठी!
हात हवे मज
असे शुभंकर अन् प्रलयंकर
शांतिरुप जे
ज्यात जळे परि विराट संगर'[१८]

वत्सल, क्षमाशील, गंगेहून पवित्र, चुकलेल्या पांथस्थना दीप होऊन मार्गदर्शन करणारे, असे हात कवीला हवे आहेत. तसेच जे सृजनशील आहेत आणि पार्थिवतेतून अपार्थिवतेचे गीत जे निर्माण करतात, असे चिरसौंदर्याची मूर्ती घडवणारे हात कवीला हवे आहेत.

जे ख्रिस्तासारखे पवित्र आहेत. त्याच बरोबर ज्यांनी परमेश्वराचा बाजार मांडला आहे. अशांवर आसूड ओढणारे कणखर हात कवीला हवे आहेत. जे हात प्रार्थनेसाठी जुळतात आणि संत तुकारामांच्या शब्दांप्रमाणे 'उरलो उपकारा पुरता' असा ज्यांचा भाव आहे असे मंगल, पवित्र हात कवीला हवे आहेत. अशा पवित्र हातरुपी कुटुंब व्यवस्थेचा कवी उदोउदो करतात.

मानवजातीच्या कल्याणासाठी अशा कुटूंबप्रमाणकारी संकल्पना कवीला अभिप्रेत आहे. त्यामुळे निसर्गाच्या पुढील दृश्यातून कवी हाच विचार व्यक्त करतात.

'सळसळत हा पळस उभा
दूर न्याहळी देवालयाचा कळस नभा'[१९]

पळसाची सळसळ जणू एखाद्या भक्ताच्या मनाची तळमळच आहे, दूरचा देऊळाचा कळस भक्ताने पहात आहे. 'निवांत' या कवितेतील निसर्गानुभवाला कौटुंबिक वातावरणाचे वत्सल रुप प्राप्त होते. इथे कवी कोवळ्या पाण्याचा लख्ख आरसा, ढगांचा गुलजार ससा, सळसळणारा पळस, शालीन कौलांची घरे - एखाद्या छोट्या कुटुंबातील रसिक, प्रणयोत्सुक व धार्मिक अशा वातावरणाचे भावरुप आपल्यापुढे साकार करतात.

ढगाच्या गुलजार सशाचे लख्ख नितळ पाणी आरशात डोकावणे जणू कुटूंबातील छोट्याशा बाळाचे बाळपणच, पळसाचे सळसळणे जणू घरातील वृध्द व्यक्तीची हरिभक्ती, कुटूंबातील व्यक्तींच्या भावनां विविध निसर्गप्रतिमांतून सूचित करतात. त्यात प्रामुख्याने अतिथ्यशीलता उठून दिसते. 'शालीन कौले' ही प्रतिमा अतिथ्यशील पतिव्रतांचे रुप डोळ्यापुढे आणते. त्यामुळे सारीच घरे कुलीन होतात. घरामध्ये अशी समृध्दता, तृप्तता, शांतता पाहून घराचा मालक सुखाने न्हावून जावा, प्रसन्न व्हावा हे स्वाभाविकच आहे. त्यामुळे 'निवांत' या शीर्षकाची समर्पकता स्पष्ट होते. एकंदरीत जीवन जगण्यावरील श्रध्दाच इथे दिसून येते आणि या श्रध्देपोटीच आगळ्यावेगळ्या प्रतीतीचे भाव कवीच्या अंत:करणात दाटून येतात म्हणून ते म्हणतात -

'अणूंत अणूंत, परमाणूत हवेच्या
आहेस तू!
रोमारोमात भूमीच्या, कोंबाकोंबात बीजाच्या
आहेस तू!
तुझ्या स्वागतार्थ पण
जागे हवे माझे मन... जागे हवे माझे मन'[२०]

पाडगांवकरांना चराचर सृष्टीत चैतन्य दिसू लागते. अणू-परमाणूत त्याचे दर्शन होते, निसर्गाच्या दिव्य शक्तीशी कवीच्या तारा जुळल्यामुळे असा दिव्य, भव्य, मंगल साक्षात्कार त्यांना घडतो. या चराचर सृष्टीत परमेश्वराचे अस्तित्व कवीला जाणवते. ईश्वर निसर्गाच्या रुपरस गंधातून, अवतीभोवतीच्या चराचरातून प्रकट होतो. आपल्या अनंतकरांनी या सृष्टीवर वेगवेगळ्या गोष्टींची उधळण करणारी ही परमेश्वराची अनंत रुपेच आहेत हे कवीला जाणवते. निसर्गालाच परमेश्वर मानून त्याची पूजा करणारा आदिमानव व आज त्याच निसर्गात परमेश्वराची रुपे शोधणारा माणूस ही दोन वेगळी नाहीत भारतीय अनमोल संस्कृतीची हातात हात घालून शाश्वत सत्याकडे जाणारी टोके आहेत नेमकी हिच श्रध्दा, पाडगांवकरांच्या कवितेतून दिसून येते.

## पार्थिवतेचा जयजयकार अर्थात जीवनशक्तीची श्रेष्ठता

'अनंत अथांग आकाशाखाली
गंधित मौनास इवल्या फुलाच्या
फुटला अंकुर कोवळ्या स्वराचा
सारे साठवून
सारे साठवून
फूल म्हणाले
उमलते मी...उमलते मी'[२१]

हिरव्या तृणात उमललेल्या इवल्या फुलाची कहाणी सांगताना पाडगांवकरांनी जीवनशक्ती किती आणि कशी श्रेष्ठ असते हे सांगितले आहे. वारा जीर्ण विचारांची, संकेतांची पाने वाहून नेऊन राने निर्मळ मोकळी करतो. खळखळत वाहणारी नदी स्वत:चा उल्लेख लोकमाता अशी करते. लोकसेवेचे व्रत घेऊन धावणारी नदी आपल्या दोन्ही हातांनी अमृतवृष्टीच करत आहे; जनजीवन समृध्द करत आहे. आकाशात कडाडणारी वीज त्वेषाने म्हणते अंधार भेदण्याचे सामर्थ्य माझ्यात आहे. जीर्ण आकारास, जीर्ण वस्तुना मुक्ती देण्याचे काम माझ्या

प्रहारांनी मी करते. त्याचवेळी जणू वनपरीचे स्वप्न असलेले गवतावरचे फूल नदीचे, वाऱ्याचे अहंकारी शब्द ऐकून न डगमगता म्हणू लागते, 'उमलते मी .... उमलते मी' साध्या गवतावर उमलणाऱ्या इवल्याशा फुलाची जर जीवन जगण्याची ही जिद्द असेल तर आकाशाला कवेत घेवू पहाणाऱ्या माडांची मन:स्थिती कशी असेल?

'उभारुन कर उभे माड हे
शिरि वीरापरि झेलित वृष्टी
जरा पहावे क्षितिजावर तर
बुडून जाते धुक्यात दृष्टी'[२२]

एखाद्या वीराप्रमाणे माड जलधारा झेलीत आहेत, त्यांचे स्वागत करीत आहेत. कितीही अडथळे आले तरी त्यातून मार्गक्रमणा करणारी निसर्गातील प्रत्येक घटना कवीमनाचा ठाव घेते. पंख भिजलेला पक्षी, दूरवर हसणारे दिवे, कौलातून बाहेर येणारा धूर, वाऱ्याचा नाद, धुराच्या काजळीचा ध्वज मिरवत येणारी आगगाडी या सर्व प्रतिमांतून जीवनाचे स्वागत आनंदाने करणारी वृत्तीच दिसून येते. पण कवी जीवनाचे नुसते स्वागतच करुन थांबत नाहीत तर

'मातीची ही मात मृत्युवर
मृत्युंजय श्रध्देचा अंकुर
हा सृजनाचा विजयध्वज, हा जीवनसाक्षात्कार
पहिल्या हिरव्या तृणपात्याचा आज असे सत्कार'[२३]

कवी हिरव्या तृणपात्याचे नुसते स्वागत न करता त्याच्या सृजनशीलतेचा ते गौरव करतात, त्याचा सत्कार करतात. कारण त्याने मातीवर मात केली आहे. मातीचे कवच भेदून अंकूरताना केवळ जीवनश्रध्देच्या बळावर तृणपाते मृत्युंजय झाले आहे.

ह्दयात ज्वालारस घेवून धरतीने तप केले, नद्या सुकू लागल्या. त्याचवेळी धरतीच्या पोटी इवल्या बीजाने श्रध्देची ललकारी दिली आणि भूमीचे कवच भेदून हे हिरवे कौतुक वर आले. हे हिरवे कौतुक सृजनाचा विजयध्वज आहे, जीवनाचा साक्षात्कार आहे. चैतन्याचे स्वप्न मूर्तिमंत साकार होणे हाच जीवन शक्तीचा विजय आहे. या गौरवशाली आनंदाची विविध रुपे निसर्गानुभवातून प्रतीत होतात. म्हणून कवी या पार्थिवतेचा जयजयकार करतात.

'जय जय हे पार्थिवते
जय जय हे वृक्षांतिल, पक्षातिल पार्थिवते
जय जय हे मातीतिल, मुर्तितिल पार्थिवते

जय जय हे अन्नातिल, वस्त्रातिल पार्थिवते
जय जय हे रंग-धंग-नादमयी, जय जय आकारमयी
ब्रम्ह तुझ्या गर्भातच वाढतसे
विकसतसे....विकसतसे....
जय जय हे पार्थिवते!'[२४]

ब्रम्ह जिच्या गर्भात नित्य विकसत असते त्या पार्थिवतेचा जयजयकार पाडगांवकर करतात. या मातीवर ते अपार प्रेम करतात.

निसर्गाशी कवीचा चाललेला हा संवाद त्याला केवळ सौंदर्याच्या विभ्रमात बांधून घेत नाही तर जीवनातील अंतिम सत्याचा शोध घेण्यास प्रेरित करतो, पाप-पुण्याच्या कल्पना पडताळून पाहायला लावतो. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांचे ऋण मान्य करण्यास सांगतो. या मातीशी असणारे अतूट नाते कवीला कळते. माती हेच सत्य आहे. पार्थिवता हाच जयनाद आहे. या आत्मप्रतीतीने पार्थिवतेचे सूक्तपाठ कवी गातो. पार्थिवतेचे स्वागत कवी मन:पूर्वक करतात कारण ही पार्थिवता म्हणजे सृजनशक्तीचा अपूर्व आविष्कार आहे.

## चैतन्याचे वेड

पाडगांवकरांना परमेश्वर निसर्गाच्या रुपरस गंधामध्ये, अवतीभोवतीच्या चराचर सृष्टीमध्ये दिसतो. त्यामुळे त्याशिवाय वेगळे असे त्याचे दर्शन घडावे असे कवीला वाटत नाही. भारतीय तत्व विचारातील अद्वैतभावाचा काव्यमय आविष्कार पाडगांवकरांच्या कवितेत दिसतो. जसे -

'तुला पाहिले ऋतूऋतूतुन, फुलाफळातून,
या गगनातुन, या मातीतुन, स्थितीगतीतून
संघर्षातुन, सुखदु:खातुन, व्यथेव्यथेतून
या सृष्टीतुन अन् भवतीच्या मानवतेतून
रे कसे शोधु तुज वेड्यापरि मी तुलाच टाकुन?
मी कधीच नाही म्हटले की तू दे मज दर्शन?'[२५]

चराचर सृष्टीच्या चैतन्यमय रुपातून कवीला परमेश्वर दिसतो. प्रत्येकाच्या मनामध्ये त्याचीच चेतना असते, कर्म करायला प्रेरणा देणाराही तोच आहे, त्याच्याशिवाय मानवाचे जीवन सिध्द होऊ शकत नाही अशी पाडगांवकरांची श्रध्दा आहे.

ऋतूऋतूतुन, फुलाफळातून, गगनातून, मातीतून, पृथ्वीवरील जीवांच्या जीवनातून, संघर्षातून आणि व्यथातून कवीला परमेश्वर दिसतो. त्यामुळे या सर्वांमध्ये एक प्रकारचे चैतन्य ओसंडून वहात असलेले कवीला दिसते. याच विचारातून कवी म्हणतात -

'सुंदर आहे माझी वासना
सुंदर जशी आषाढघनांची उन्मत्त गर्जना
जिच्यात लपली नव्या सृजनाची अद्‌भूत प्रेरणा'[२६]

'सुंदर आहे माझी वासना' असे कवी निर्भिडपणे सांगतात. त्यातून उद्याच्या मानवतेचे दिव्य शिल्पकार हात कवीला हवे आहेत.

जीवनाच्या अखंड प्रेमामुळेच जे काय हवे असते-कवी जे अनुभ्वत असतो त्यात सखोल चिंतन असेत. जीवन सफल होण्यासाठी सौंदर्याबरोबर वत्सलता, मायेची पखरण, श्रम-प्रतिष्ठा, शांतता, चिरजागृती करुणा, मृत्यूंजयता-अमृतमयता, मांगल्य यांची आवश्यकता आहे असे कवीला वाटते. त्यातूनच कवी उद्याच्या मानवतेचे दिव्य स्वप्न पाहातो. हे चैतन्याचे स्वप्न मूर्तिमंत साकार होणे हाच जीवनाचा आनंद आहे. या आनंदाची विविध रुपे कवीला दिसतात.

'पाणिवरती जळत्या नीरवतेच्या
तेवढीच ती फुंकर गार स्वरांची!'[२७]

ग्रीष्मऋतूतील रखरखणाऱ्या, मन उदास करणाऱ्या वातावरणातसुध्दा एखादा मुठीएवढा लाजरा पक्षी नाजूक, चंचल शीळ घालतो आणि तेवढीच ती गार स्वरांची फुंकर नव्या जीवनाचा आनंद घेवून येते. अगदी प्रतिकुल परिस्थिती असतानाही जीवनाला आनंदाने व धीराने सामोरे जाण्याची कवीची वृत्ती जीवनशक्तीची श्रेष्ठता व आवश्यकता प्रस्तुतच्या प्रसंगातून दिसून येते.

## आत्मचिंतन

पाडगांवकरांच्या काही कविता आत्मचिंतन करायला लावतात. 'कधी पाहतो' या कवितेत माणसामध्ये दडलेल्या 'दानव' व 'विराट मानव' या दोन प्रतिमा कवी व्यक्त करतात. वरुन सौजन्यशील दिसणारा माणूस आतमध्ये वेगळाच असू शकतो. आत्मचिंतनामुळे या गोष्टींना उजाळा मिळतो आणि योग्य मार्गक्रमण होण्यास मदत होते. म्हणून प्रत्येकाने आत्मचिंतन केले पाहिजे असे कवी म्हणतात.



SHRI. B... ...KAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

'कधी पाहतो
मी माझ्यातच विचित्र मानव
क्षुद्र अविकसित विद्रुप दानव'[२८]

कधी मला माझ्यातच क्षुद्र, अविकसित विद्रुप दानव दिसतो. अंधारातुन, चिखलातुन, वृक्षमुळांसारखे भूविवरातुन चेटकिणीच्या हातासारखे आपले शरीरी घृणास्पद झालेले दिसते. विशेष म्हणजे हेच मी अंधपणे गौरवाने मिरवत असतो. तर काही वेळा मात्र -

'कधी पाहतो
मी माझ्यातच विराट मानव
पावलातुनी उमले ज्याच्या उषाच अभिनव'[२९]

माझ्यातला विराट मानव मला दिसतो. त्याच्या पावलातून उषा उमलत आहे, हिमालयाप्रमाणे उत्तुंग ज्याचा देह आहे, ज्याने शिरावर रविकिरणांचा मुकूट धारण केला आहे, ज्याच्यातून पवित्र गंगेची निर्मिती झाली आहे, ज्याच्या ओठामधून मृत्यूंजय मंत्राची निर्मिती होत आहे, जो अमर्त्यतेच्या वाटेवरला जीवनयात्री आहे, ज्याच्या भालप्रदेशावर रवि आहे, गात्री अमृत आहे, ज्याच्या मंगल नेत्रांमध्ये चिरसंजीवन आहे, असा मोठ्या आणि पवित्र मनाचा मानव माझ्यामध्ये दडलेला मी पाहतो.

शेवटी माझ्यातील विद्रुपतेचा आणि विराटतेचा साक्षीदार मीच आहे. याची जाणीव मला हाते. जीवन जगताना आपल्या मनाशी आपणच संवाद साधायचा असतो आणि त्यातून योग्य तो मार्ग निवडायचा असतो म्हणजे आपोआपच दानवरुपी विद्रुपता नाहीशी होवून पवित्र मनाने जीवन जगण्याची प्रेरणा मिळते. मग दाट धुक्यातसुध्दा रस्ता चुकत नाही.

'धुक्यात आम्ही कोरित बसतो
गुपित मनातिल थरथरणारे
विणीत बसतो लाटांमधले
प्रतिबिंबाचे गूढ इषारे!'[३०]

धुक्यात मनातील थरथरणारे गुपित कोरत बसतो हे सांगताना जे अती कठिण आहे, जे पकडणे, व्यक्त करणे प्रकाशातही अशक्य आहे ते धुक्यात कोरीत बसणे, त्या गुपिताला आकार देणे, रुप देणे आणि तेही जिथे स्वर्ग धरतीला येऊन मिळाला आहे. जिथे निसर्गसौंदर्याचे गुपित कळते-जाणवते परंतु प्राप्त होत नाही, तरी पण जाणवणारेच हे तरल क्षण त्याचा आस्वाद कवी घेतो.

या धुक्यात एकाच वेळेस कोरणे व विणणे अशा दोन क्रिया चालू असतात. त्या क्रियांनी त्या थरथरणाऱ्या कोमल गुपिताला विशेषता प्राप्त होते. लाटांमधल्या प्रतिबिंबाचे गुढ इशारे धुक्यात विणत राहाणे हा एक अजबच खेळ आहे. त्यातून कवी अज्ञाताचा शोध घेतो आणि हा शोध घेण्यासाठी जीवनशक्तीसुध्दा तितकीच श्रेष्ठ असावी लागते म्हणूनच कवी म्हणतात -

'डवरला काळ पारिजातसा
क्षणांच्या शुभ्र फुलांनी असा
अमल ही नीरवता अंतरी
साठवी क्षणपुष्पांच्या सरी!'[३१]

अवती-भोवतीचे वातावरण नेहमी आपल्या मनासारखे असतेच असे नाही मात्र मनाचीच प्रसन्नता असेल तर या वातावरणावर मात करुन पुढे निश्चित जाता येते म्हणून कवी म्हणतात काळ्या परिजातकारखा क्षणांच्या शुभ्र फुलांनी डवरला आहे आणि या विश्व शांततेत अंतरी क्षणपुष्पांच्या सरीच साठवत आहे मात्र काही वेळा मन इतके शांत होते की काही स्फुरत नाही, नवनिर्मिती होत नाही. अगदी शांत किनाऱ्याप्रमाणे मनाची अवस्था होते. असे असले तरी -

'स्निग्ध पहाटे
कोवळे आकाश लाटांत दाटे,
दूरात अंधुक चमके तारा
शांत किनारा!'[३२]

कोवळे आकाश लाटात दाटणे, अंधूक तारा चमकणे, या प्रतिमा नवीन कल्पना सुचल्याचे सांगतात. हा नवनिर्मीतीचा हव्यास कवीच्या मनाची अवस्था वर्णन करतो. या हव्यासापोटीच ते जीवनातील सत्य-सुंदरता-पवित्रता शोधण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी ते पुराण प्रतिमांचाही वापर करतात.

'विनाश आहे भरुन भवती
तुमच्या अमुच्या जगी खरे, पण...
तुमच्या अमुच्या जगापलिकडे आहे जीवन..विशाल जीवन
विहरत... खिदळत... नित्य विकासत
जास्वंदीची लाल फुले ती
जाईजुईचे कुलीन सुंदर सलज्ज वैभव

झाडे...पक्षी...डोंगर...वारे
नक्षत्रांचे शुभ्र इशारे
फूलहि इवले या विश्वातिल
उभे कसे डौलात पहा ना मरण जिंकुनी
उभा जसा हो कालियाचिया मस्तकावरी पाय ठेवुनी
तो योगेश्वर... तो बन्सीधर
अणुरेणूतुन या सृष्टीच्या सृजनाचे ऐश्वर्य उधाणे
म्हणुन तरळते अजूनही ओठांवर गाणे'[३३]

कालियाच्या मस्तकावर पाय ठेवणाऱ्या बन्सीधराचे रुप इवल्याशा फुलात आहे. या क्षुद्र मानवी जीवनापलीकडे पसरलेले अथांग विशाल जीवन तिच्या अणू-रेणूत-सृजनाचे ऐश्वर्य उधाणत असल्यामुळेच आपल्याही ओठात गाणे आहे अशी पाडगांवकरांची श्रध्दा आहे, निष्ठा आहे, भक्ती आहे. खळखळणाऱ्या लाटांवरचा खिदळणारा फेस, पश्चिम क्षितिजाच्या माळावर रुळणारी सावल्या ढगांची बट, शांत झोपल्या धुळीस गुदगुल्या करणाऱ्या चंचल सावल्या, संथ निळ्या पाण्यामधील सुजाण आशय, या सृष्टीच्या कणाकणात सौंदर्यतराणे आहेत आणि म्हणूनच आपल्या ओठांवर गाणे आहे अशी कवी पाडगांवकरांची निष्ठा आहे. मात्र माणूस आपल्या दैनंदिन व्यावहारीक जीवनात इतका गुरफटून जातो की त्याच्या ओठावरचे गाणेच हरपून जावे. त्यामुळे जीवनाच्या खऱ्या आनंदापासून तो वंचीत राहतो. जेंव्हा ही चूक समजून येते तेंव्हा -

'आता बसलो आहे शोधित
दीर्घ तपस्येतहि जे हुकले
हात कपाळा लावुनि बघतो
कसे काय अन् कोठे चुकले!'[३४]

असा पश्चाताप होतो.

कवी म्हणतात शास्त्रे, पुराण, गीता मुखोद्गत केली, ईश्वराच्या अस्तित्वाविषयीच्या चर्चेमध्ये सामील झालो. जगाचा इतिहास, विज्ञानाचे पारायण, भूगोलादि विद्या जिव्हेवर नाचल्या. तत्वज्ञान, समाजरचना, अर्थशास्त्र, परमार्थशास्त्र यातही पारंगत झालो, मात्र आषाढातील पहिला पाऊस झेलण्यासाठी रस्त्यावरील मुलांप्रमाणे आपली कृती झाली नाही याचे कवीला वाईट वाटते. म्हणजेच माणसाचे जसे वय वाढत जाते तशी त्याची वृत्ती बोथट होत जाते. हाच अनुभव अधिक येतो. म्हणून कवी कपाळाला हात लावून दीर्घ तपस्येतही नेमके काय

चुकले हे शोधत बसला आहे. कारण भारतीय आध्यात्मात सांगितल्याप्रमाणे 'चौऱ्याऐंशी लक्ष योनीतून आल्यावर मनुष्य देह मिळतो' मात्र एवढ्या दुर्लभ असलेल्या देहाची किंमत फारच थोड्यांना समजते. त्यामुळे जीवनाच्या मनमुराद आनंदाला मुकलेले मन म्हणू लागते -

'बरेच दिवस
कैफ चढून रंगलो नाही
बरेच दिवस
जगूनसुध्दा जगलो नाही'[३५]

बरेच दिवस कुणासाठी झुरलो नाही, हुरहुरलो नाही, खदखदून हसलो नाही, दुरच्या ढगात डोळे लावून बसलो नाही, रोजची वाट चुकली नाही, मनात वीज झुकली नाही, शीळ घालीत हिंडलो नाही, माझ्यात मीच बुडलो नाही,कैफ चढून रंगलो नाही त्यामुळे जगूनसुध्दा जगलो नाही. ही खंत एका बाजूला असली तरी जीवन जगण्याची कसरत ही करावीच लागणार आहे याचीही कवीला जाणीव आहे. कारण वास्तव असे आहे -

'तोल सावरीत अशी
तारेवर कसरत
धन टाळ्यांचे पदरी
जरी मन घसरत!'[३६]

आयुष्यात खूप काही करण्याची धडपड असते, उरी स्वप्नांचा खजिना असतो. पण वास्तव काही वेगळेच असते, कारण आता एकमेव सत्य कळलेले असते ते म्हणजे 'रुपयाचे आणे सोळा!' ते सांभाळीत मनातच चंद्र जपून उडायचे म्हटले तरी रितेपणाचाच धनी होणार याची चाहूल लागते. अशी तोल सावरत तारेवरची कसरत चाललेली असते. चोहोबाजूंनी टाळ्यांचा वर्षाव होत असला तरी मन मात्र घसरत असते. हळूहळू मनात जपून ठेवलेल्या इच्छा-आकांक्षांचा चंद्र विरघळायला लागतो आणि निंबोणीच्या झाडामागे फक्त अंधारच उरला असल्याची जाणीव होते. तरी कवी स्वत:ला कसेबसे सावरीत तारेवर उभा आहे. भोवती गर्दी आहे, धुंद टाळ्या धुंद हसणे आहे. जीवनाचे दु:ख पचवून इतरांना सुखी, आनंदी करणे हेच आपले ध्येय आहे याची जाणीव आता होवू लागली आहे. हेच जिवनावरचे प्रेम आहे.

## सारांश

मंगेश पाडगांवकरांनी समकालीन कांही कवी निराशवादी वैफल्याचा सूर आळवित असतांना देखील जीवनातील चैतन्याचे गीत गाइले आहे. कवींची जीवनावर अपार श्रध्दा आहे. तसेच जीवनाबद्दल त्याना प्रचंड ओढ वाटते. त्यामुळे भावनेच्या जोशात ते जीवनाची गाणी गातात. हा जोश शब्दाशब्दातून रसिकाच्या मनाची सहज पकड घेतो.

पाडगांवकर निसर्गसौंदर्याच्या विभ्रमानी आनंदित होतात. त्याचवेळी त्याबद्दलच्या चिंतनातून जीवनाचा अर्थ शोधतात. निसर्गातच नव्हे तर चराचरात माणसामाणसात त्यांना परमेश्वराचे अस्तित्व जाणवते. मनाला आतून होणाऱ्या या अस्तित्वाच्या जाणीवेचा शोध घेण्याची तीव्र इच्छा त्यांच्या मनात जागी होते. दूरवरुन अनंताची साद त्यांच्या मनाला ऐकू येते. निसर्गसौंदर्याचे गुपित कळते जाणवते. परंतु प्राप्त होत नाही. अशा जाणवणाऱ्या गूढ तरल क्षणांचा आस्वाद कवी घेतो. तरल धुक्यात एकाच वेळी कोरणे आणि विणणे चालू करतो. अज्ञाताचा शोध घेत राहतो.

कवी हसत जीवन जगणार आहेत. त्यामुळे पायीचे कंटक काढून दुःखाना पचवून पुढे गेले पाहिजे, अंधार पिऊन चांदण्याचा वर्षाव करण्यातच पुरुषार्थ आहे असे कवीना वाटते. त्यामुळे दुःख स्वीकारुन प्रकाशाचे गाणे गाणारे आनंदयात्री ते होतात. या सृष्टीच्या कणाकणात सौंदर्यतराणे आहेत म्हणूनच आपल्या ओठावर गाणे आहे अशी पाडगांवकरांची निष्ठा आहे ही माती हा निसर्ग हेच सत्य असल्याच्या प्रतीतीमुळे कवी पार्थिवतेचा गौरव करतात.

पाडगांवकर आशावादी आहेत. म्हणूनच अंधाराकडून प्रकाशाकडे, निराशेकडून आशेकडे धावणारे मन त्यांच्या ठिकाणी जगण्याबद्दलचा विश्वास निर्माण करते.

पाडगांवकरांच्या भावविश्वात अज्ञाताचा शोध घेणारी, सौंदर्याच्या पाऊल खुणा शोधणारी जी वृत्ती आहे तिचेच नांव 'जिप्सी' आहे. 'एक जिप्सी माझ्या मनात खोल आहे दडून' असे सांगतानाच या जिप्सीमुळेच अनेकदा मनाची तगमग कशी होते हे कवीनी 'दुःख' मध्ये मांडले आहे. जगण्याच्या आसक्तीतून मी घरटे निर्माण करतो मात्र घरट्यात सुरक्षितता अनुभवत असतांनाच गगनाच्या भव्यतेचे आकर्षण वाटते. उडण्याचे वेड निर्माण होते. घराचा भावबंध तुटु पाहतो. उत्तुंग आकाशात भरारी घेतल्यावर एकाकीपण जाणवून सुरक्षित घरट्याची ओढ निर्माण

होऊन मन घरट्याकडे झेपावते. अशी ही भावनांची गुंतागुंत, मनाचे द्वंद्व कवी अनुभवतात. घरट्याचा लोभ जगण्याची प्रीती आणि गगनाची ओढ यातून जन्मलेले विचित्र दु:ख पाखराच्या रुपकातून ठळकपणे व्यक्त झाले आहे.

एखाद्या संध्याकाळी उरल्या सुरल्या प्रकाशकणिका काळोखात विरल्यामुळे उदासीनता वाढते. मात्र लाल केशरी जाळ क्षितिजावर दिसतो त्यातून पहाट होणार असल्याचा आशावादी संदेश कवीला मिळून उदासीनतेचे पटल गळून पडते मातलेला अंधार काळ्या जमीनीला घट्ट कवळतो आहे. या पाडगांवकरांच्या निसर्गानुभवाला मीलनाची तृप्तता आहे. आशेचे भावांकुर आहेत, सृजनाचे स्वप्न आहे म्हणूनच काळोखाला नक्षत्रांचे कोंब येतात. असाच आशावाद 'अजुन व्हायची जरी पहाट' या कवितेतही दिसतो.

वेदनेची असह्य कळ असलेल्या जगण्यातच उबेचे भव्य स्वप्न सामावलेले आहे असा विश्वास पाडगांवकरांच्या कवितेतून दिसतो. मात्र काही वेळा खिन्नता, निराशा पंख छाटलेल्या पाखरासारखी अंधारावर पसरलेली दिसते. अशावेळी कवी आपल्या मनाला शांत स्तब्ध राहण्याचे आवाहन करतात. ही निराशजनक एकाकीपणाची अवस्था जास्त काळ रहात नाही. कारण अंधाराला ज्या क्षणी नक्षत्रांचे व आपले नाते कळते त्या क्षणाला भूमीचा स्तर भेदून हिरवे गवत पाते वर येते. आकाशाने आपले मी पण विसरुन धरेला दृढ अलिंगन दिलले असते. आषाढी ढगाने मातीचे लवून चुंबन घेताच हे परिवर्तन आकस्मित घडते. निसर्गातला हा गंधीत क्षण कवीच्या जीवनात असाधारण ठरतो. कवीला मातीची सृजनशिलता कळते.

जीवनावर भरभरुन प्रेम करणाऱ्या कवी पाडगांवकरांना जीवन मंत्राप्रमाणे आनंदी करणाऱ्या साथीदाराची-प्रेयसीची-ओढ वाटते. अवतीभोवतीचा निसर्ग, चराचरसृष्टी या सर्वातच आनंद भरुन राहिलेला आहे असे मानणाऱ्या पाडगांवकरांनी आपल्या प्रेयसीबद्दलच्या अपेक्षा अशाच निसर्गदृश्यातून आणि निसर्ग प्रतिमातूनच व्यक्त केल्या आहे. तिने नित्य नव्या रुपात रस-रंग-नाद-गंध या सर्वातून यावे. पहाटे येताना धुके किंवा दव बनून हलकेच अवतरावे कळीने जसे पानाआडून हळुच फुलावे तसे तिचे फुलणे कवीला भावते. वत्सल, क्षमाशील, गंगेहून पवित्र, दूरस्थ पांथस्थाना दीप होऊन मार्गदर्शन करणारे, जुई पुष्पापेक्षाही मार्दव असणारे नाजूक, कोमल हात कवीना साथीदाराच्या रुपात हवे आहेत.

हिरव्या तृणात उमललेल्या इवल्या फुलाची काहणी सांगताना जीवनशक्ती किती आणि कशी श्रेष्ठ आहे हे सांगितले आहे. (कधी एकदा कविता)

विविध प्रतिमातून जीवनाचे स्वागत पाडगांवकर करतात. इतकेच नाही तर पहिल्या हिरव्या तृणपात्याचा अत्यंत उत्कटतेने सत्कार करतात. हा सत्कार म्हणजे सृजनशीलतेचा गौरव असतो. चैतन्याचे स्वप्न मूर्तिमंत साकार होणे हाच जीवनशक्तीचा विजय आहे. हे हिरवे कौतुक सृजनाचा विजयध्वज आहे. म्हणूनच कवी पार्थिवतेचा जयजयकार करतात. ही पार्थिवता म्हणजे सृजनशक्तीचा अपूर्व अविष्कार असेच कवीना वाटते.

पाडगांवकरांना जीवनातील चैतन्य भावते. ते चराचर सृष्टीच्या विविध रुपातून जाणवते. या चैतन्यमय रुपात त्यांना परमेश्वर दिसतो. कर्म करण्याची प्रेरणा देणाराही तोच आहे. त्याच्याशिवाय मानवाचे जीवन सिध्द होऊ शकत नाही. अशी पाडगांवकरांची श्रध्दा आहे.

जीवनाकडे सकारात्मक आशावादी दृष्टीने पाहणाऱ्या सश्रध्द असणाऱ्या पाडगांवकरांनी चराचरात, निसर्गात परमेश्वराला पाहिले आहे. त्याचप्रमाणे स्वत:मध्येही डोकावून पाहिले आहे. 'कधी पाहतो' सारख्या कवितेतून मानवासंदर्भातले हे आत्मचिंतन प्रगट झाले आहे. एकाच माणसात 'दानव' आणि 'विराट मानव' असे दोघेही दडून कसे बसलेले असतात हे कवी सांगतात.

जीवन जगताना आपण आपल्याशीच संवाद साधून योग्य मार्ग निवडायचा असतो. संवाद साधण्यामुळे दानवरुपी विद्रुपता नाहिशी होते. जिवनाबद्दल आसक्ती वाढून जगण्याची नवी चांगली प्रेरणा प्राप्त होते. मग धुक्यातसुध्दा रस्ता चुकत नाही. स्वत:शी संवाद साधत असताना नवनवीन कल्पना स्फुरतात. नवनिर्मितीची प्रेरणा मिळते. अथांग विशाल जीवनातील अणू रेणूत सृजनाचे ऐश्वर्य दडले असल्याचे समजते. म्हणूनच दैनंदिन व्यवहारी जीवन जगताना माणसाने आत्मसंवाद साधावा असे कवी सुचवतात. व्यवहारी जीवनातच रमल्याने कित्येकदा माणसे खऱ्या आनंदापासून वंचित राहतात. ही चूक जेव्हा उमगते तेव्हा पश्चातापाशिवाय काहीच मिळत नाही. 'कैफ चढून रंगलो नाही, जगूनसुध्दा जगलो नाही' असे म्हणण्याची वेळ येते.

अशी खंत एकीकडे वाटली तरीही जीवन जगण्याची तारेवरची कसरत प्रत्येकाला करावीच लागते. उरी स्वप्नांचा खजिना असतो. त्यामुळे खूप काही करण्याची धडपड चालूच असते. धुंद टाळ्या, धुंद हसणे स्वीकारत दु:ख पचवून इतरांना सुखी आनंदी करण्यासाठी धडपडत जीवनाची वाटचाल चालू असत्याचे कवी सांगतात.

जीवनाचा समग्र अर्थ कवीनी अंतर्मुख होऊन निसर्गातून, भोवतीच्या वातावरणातून माणसातून शोधला आहे.

## - संदर्भ -

१) जिप्सी - प्रस्तावना - बा.ल. कुलकर्णी पृ.क्र. ११
२) जिप्सी - जिप्सी पृ.क्र. ०२
३) जिप्सी - जिप्सी पृ.क्र. ०२
४) जिप्सी - धुक्यात आम्ही कोरित बसतो पृ.क्र. २९
५) जिप्सी - आनंदयात्री पृ.क्र. २३
६) जिप्सी - आता उजाडेल पृ.क्र. ०४
७) जिप्सी - दुःख पृ.क्र. १९
८) जिप्सी - ही उदास संध्याकाळ पृ.क्र. ३९
९) जिप्सी - रात्र भिजली पृ.क्र. ५७
१०) जिप्सी - अजून व्हायची जरी पहाट पृ.क्र. ६२
११) जिप्सी - अशा वेळी पृ.क्र. ७४
१२) जिप्सी - विषाद पृ.क्र. १००
१३) जिप्सी - निर्मिती पृ.क्र. ४४
१४) जिप्सी - चिरनूतन पृ.क्र. १०
१५) जिप्सी - जर पहाटेच येणार तरी पृ.क्र. ११
१६) जिप्सी - मी फूल तृणातिल इवले पृ.क्र. १७
१७) जिप्सी - तुझी निराळीच तऱ्हा पृ.क्र. ३४
१८) जिप्सी - हात हवे मज पृ.क्र. २५/२६
१९) जिप्सी - निवांत पृ.क्र. ५६
२०) जिप्सी - आज जागे आहे मन पृ.क्र. ६८
२१) जिप्सी - कधी एकदा पृ.क्र. ४८
२२) जिप्सी - किमया पृ.क्र. ५०
२३) जिप्सी - सत्कार पृ.क्र. ५२
२४) जिप्सी - जय जय हे पार्थिवते पृ.क्र. ६१
२५) जिप्सी - दर्शन पृ.क्र. ६७
२६) जिप्सी - सुंदर आहे माझी वासना पृ.क्र. ९३
२७) जिप्सी - फुंकर पृ.क्र. ९९
२८) जिप्सी - कधी पाहतो पृ.क्र. २७

| | | | |
|---|---|---|---|
| २९) | जिप्सी - | कधी पाहतो | पृ.क्र. २७ |
| ३०) | जिप्सी - | धुक्यात आम्ही कोरित बसतो | पृ.क्र. २९ |
| ३१) | जिप्सी - | क्षणपुष्पांच्या सरी | पृ.क्र. ४३ |
| ३२) | जिप्सी - | शांत किनारा | पृ.क्र. ४९ |
| ३३) | जिप्सी - | गाणे | पृ.क्र. ७९ |
| ३४) | जिप्सी - | कसे काय अन् कोठे चुकले | पृ.क्र. ९७ |
| ३५) | जिप्सी - | बरेच दिवस | पृ.क्र. १०४ |
| ३६) | जिप्सी - | कसरत | पृ.क्र. ११४ |